MHSN110006302023

**नियमित दिवाणी दावा क्रमांक १४७/२०२३ मधील**

**नि.क्र.१९वरील आदेश**

(पोपट डोंबाळे वि. खंडू डोंबाळे वगैरे)

१. वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, प्रस्तुत दावा वाटपाचा असून दावा कलम ४ मध्ये ओळ क्र.३, ''दावा मिळकती वाटून घेणेविषयी विचारणा'' यापुढे टंकलेखनदोषाने व नजरचुकीने ''केली असता त्याने नकार दिला.त्यावेळी'' असे नमूद करणेचे राहून गेले आहे. सदर दुरूस्ती ही फॉर्मल स्वरुपाची, दाव्यात व त्याच्या स्वरुपात बदल न करणारी आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. प्रतिवादी यांनी अर्जाच्या पाठीमागे अर्ज मान्य व कबूल असल्याचे कथन करुन अर्ज मंजूर करण्यास हरकत नसल्याचे कथन केलेले आहे.

४. दोन्ही पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादीने सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीने मागितलेली दुरुस्ती ही दावा कलम ४ म्हणजेच दाव्यास कारण यामध्ये नजरचुकीने काही मजकूर समाविष्ट करण्याचे राहून गेलेबाबत मर्यादित आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचा मूळ स्वरूप अथवा दाव्याचे कारण बदलत नाही. तसेच ही दुरुस्ती दाव्याच्या परिणामकारक, परिपूर्ण व अंतिम न्यायनिवाड्यासाठी आवश्यक असल्याचे दिसून येते.

प्रतिवादी यांनी अर्जातील कथने मान्य व कबूल असल्याचे स्पष्टपणे नमूद केले असून, अर्ज मंजूर होण्यास हरकत नसल्याचेही सांगितले आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही केवळ तथ्यात्मक स्पष्टतेसाठी असून, सदर दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादींना कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी, दुरुस्ती नामंजूर केल्यास वादातील कायद्याच्या दृष्टीने आवश्यक असलेली तथ्ये अपूर्ण राहून भविष्यात तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने वादीने मागितलेली दुरुस्ती करण्याची परवानगी देणे योग्य व आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा नि.क्र.१९ चा अर्ज रक्कम रु.५००/– न्यायालयात जमा करण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी निशाणी क्र.१९ मध्ये केलेल्या मागणी प्रमाणे निशाणी क्र.१ मध्ये दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

३. वादी यांनी पुढील तारखेस दुरूस्ती करुन दाव्याची प्रत दाखल करावी.

४. अर्जाचा खर्च वादींनी सोसावा.

RAHUL BHALCHANDRA KULKARNI

Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2026.03.07 17:29:40 +0530

आटपाडी. **( आर.बी.कुलकर्णी )**

दिनांक ०७/०३/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.,आटपाडी

R.B. Kulkarni
Jt. C.J.J.D. Atpadi

## Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - A. S. Yadav
Court - Jt. CJJD and JMFC, Atpadi.
Date - 07.03.2026
Order signed by the
Presiding Officer on - 07.03.2026
Order uploaded on - 07.03.2026

R.B. Kulkarni
Jt. C.J.J.D. Atpadi